ePaper
वर्ष - 9 । अंक - 7 | UDYAM-MH-26-0158827

## डोनाल्ड ट्रम्प यांना सर्वात मोठा धक्का, भारतासाठी आता चीन मैदानात!



महाईन्यूज™

**आतील पानांत**

- आशिया चषकात खेळण्यास परवानगी!
- गिलच्या कर्णधारपदाबाबत भविष्यवाणी!
- अधिवेशनात २७ विधेयके मंजूर!
- लोकशाही नष्ट करण्याचा डाव

www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 22 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**अध्यात्मातून राजकारण** डोक्यावर गांधी टोपी, तोंडात नथूराम गोडसेची भाषा!

# कीर्तनातून राजकीय "तमाशा"!

## वारकरी संप्रदायाचा मुखवटा घालून भंडारे यांचे भाजपासाठी राजकारण



**। पुणे । प्रतिनिधी ।**
**महाईन्यूज**

**डोक्यावर गांधी टोपी, कपाळावर भागवत धर्माचा बूक्का आणि तोंडावर नथुराम गोडसेच्या भाषेचा वापर करत वारकरी संप्रदायाचा प्रचारक म्हणून ओळखले जाणारे ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांच्या वादग्रस्त कीर्तनामुळे सध्या संगमनेर परिसरात मोठा सामाजिक आणि राजकीय तणाव निर्माण झाला आहे.**

संग्राम भंडारे यांनी घुलेवाडीत झालेल्या कीर्तनामध्ये अफजलखान वधाचा प्रसंग सांगताना, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांचे समर्थक 'शिवप्रेमी' नसल्याचे म्हणत गंभीर आरोप केले. त्यांच्या भाषणात हिंदुत्व, राष्ट्रवाद आणि गोडसेच्या विचारांचा उल्लेख करून राजकीय रंग चढवला गेला, असा काँग्रेसचा दावा आहे.

"भंडारे हे वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी नसून, भाजपचा अप्रत्यक्ष प्रचार करणारे राजकीय प्रवक्ते आहेत." असा आरोप काँग्रेसकडून केला जातो आहे. काँग्रेसने हा प्रकार धार्मिक आस्थेचा अपमान मानला असून, भंडारे आणि त्यांच्या समर्थकांवर फौजदारी गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, या भाषणामुळे समाजात द्वेष निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे.



**थोरात यांचा मोर्चा –**

लोकांचा प्रचंड प्रतिसाद संगमनेरमध्ये काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एक मोठा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला लोकांचा भरघोस पाठिंबा मिळाला. मोर्चादरम्यान भंडारे यांच्या भाषणावर बंदी घालावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

**ठळक मुद्दे :**

- भंडारे यांच्याकडून गोडसेंचा उल्लेक करीत जाहीर धमकी कीर्तनात गोडसेचा उल्लेख – राजकीय व धार्मिक प्रतिक्रिया
- काँग्रेसकडून गुन्हा दाखल करण्याची मागणी
- भाजपकडून अप्रत्यक्ष समर्थनाचे संकेत
- बाळासाहेब थोरात यांचा मोर्चा – सामाजिक सलोख्यासाठी आवाज

**वारकरी धर्म राजकारणासाठी की धर्मासाठी..?**

या प्रकरणामुळे एक मोठा राजकीय प्रश्न निर्माण झाला आहे – संग्राम भंडारे यांना हिंदुत्ववादी संघटनांचा पाठिंबा मिळतो आहे. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी जाहीरपणे त्यांना पाठिंबा दिला आहे. दुसरीकडे, कीर्तनासारख्या धार्मिक मंचावरून राजकीय भाषा वापरणे कितपत योग्य, यावरही समाजात चर्चा सुरू झाली आहे. "वारकरी की राजकीय प्रचारक? कीर्तनाचा धर्माच्या नावावर उपयोग करून राजकीय उद्देश साधणे हा धोकादायक प्रकार आहे." अशी खंत व्यक्त केली आज आहे. संग्राम भंडारे यांच्या वादग्रस्त कीर्तनामुळे धर्म, राजकारण आणि समाज यांच्यातील सीमारेषा पुसट झाल्याचे चित्र दिसत आहे. येत्या काळात या प्रकरणावर राजकीय पक्षांचे धोरण, प्रशासनाची भूमिका आणि समाजाचा प्रतिसाद ठरवेल की, वारकरी कीर्तनाचा मंच धर्मासाठी राहतो की राजकारणासाठी वळतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

> "वारकरी कीर्तन म्हणजे संतवाणी, शांतवाणी... पण भंडारे यांनी ती द्वेषवाणी केली."

> संग्राम भंडारे यांची कीर्तनं ही आता कीर्तन न राहता राजकीय प्रक्षोभाची पेटती मशाल ठरत आहेत. समाजात तणाव, धार्मिकतेचा अपमान आणि विचारांचं विकृतीकरण – हे सर्व भंडारे यांच्या भाषणातून घडतंय. अशा व्यक्तीवर तात्काळ आणि कठोर कारवाई झाली नाही तर, हे प्रकरण केवळ संगमनेरपुरतं मर्यादित राहणार नाही – तर संपूर्ण महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा धोक्यात येईल.
> **–बाळासाहेब थोरात,** काँग्रेस नेते.

> त्या दिवशी मी छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफजलखानाला कसा फाडला? हे सांगत होतो. त्या कीर्तनात मी राजकारणावर बोललो नाही. तिथे बाळासाहेब थोरातांच्या लोकांनी माझ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. याचा निषेध न करता थोरात "शांततेच्या मार्गाने विरोध झाला" असा दावा करीत हल्ल्याचे समर्थन करीत आहेत. त्यानंतर मी त्यांना हल्ल्याचे गांभीर्य कळावे यासाठी "आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल" असे बोललो. मी काय बोलावे...काय नाही. याबाबत संविधानाने मला अधिकार दिलेला आहे.
> **–हभप संग्रामबापू भंडारे,** कीर्तनकार.

**बेकायदा थांबे प्रकरण** ‘पीएमपी’च्या मुख्य वाहतूक व्यवस्थापकांची बदली

# बेकायदा थांबे प्रकरणी ठेकेदार काळ्या यादीत

## अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर परिवहन महामंडळाचे (पीएमपी) बस थांबे उभारताना महापालिकेच्या पथ विभागाची खोदाईसाठी; तसेच आकाशचिन्ह विभागाचा परवाना न घेणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच ‘पीएमपी’चे मुख्य वाहतूक व्यवस्थापक (व्यावसायिक) दत्तात्रय झेंडे यांची वाघोलीचे उपमुख्य व्यवस्थापक म्हणून बदली करण्यात आली आहे.**



महापालिकेचे उत्पन्न बुडविणाऱ्या ठेकेदारावर कारवाई न करणाऱ्या महापालिकेतील अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी मनसेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत संभूस यांनी केली आहे.पीएमपीचे बस थांबे उभारण्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने महापालिकेची परवानगी न घेता परस्पर बस थांबे उभारल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. संभूस यांनी याबाबतचे पुरावे दिले होते. त्यांच्या मागणीची दखल घेत पीएमपीचे व्यवस्थापकीय संचालक, अध्यक्ष पंकज देवरे यांनी संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई सुरू केली आहे. झेंडे यांची बदली वाघोली येथे करण्यात आली आहे.‘पीएमपीने तक्रारीची दखल घेऊन कारवाई केली. मात्र ज्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या कामाकडे दुर्लक्ष केले त्यांच्यावर कारवाई करावी. या ठेकेदाराकडून तीनपट दंड वसूल करावा, अन्यथा महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करण्यात येईल,’ असे संभूस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. दरम्यान, पीएमपीएमएलने बीओटी तत्त्वावर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत पाचशे स्टेनलेस स्टीलचे बस थांबे उभारण्याचे काम ठेकेदाराला दिले होते. या कामाच्या बदल्यात बस थांब्यांवर जाहिराती करण्याचे अधिकार कंपनीला देण्यात आले होते. परंतु संबंधित कंपनीने परवानगी न घेता पदपथांची खोदाई आणि वीजजोड घेतले. याबाबतची तक्रार संभूस यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि देवरे यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेत ही कारवाई करण्यात आली आहे.पुणे महानगर परिवहन महामंडळाचे (पीएमपी) बस थांबे उभारताना महापालिकेच्या पथ विभागाची खोदाईसाठी; तसेच आकाशचिन्ह विभागाचा परवाना न घेणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच

### बस थांबे उभारल्याचा प्रकार

होते. परंतु संबंधित कंपनीने परवानगी न घेता पदपथांची खोदाई आणि वीजजोड घेतले. याबाबतची तक्रार संभूस यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि देवरे यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेत ही कारवाई करण्यात आली आहे.तसेच आकाशचिन्ह विभागाचा परवाना न घेणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

‘पीएमपी’चे मुख्य वाहतूक व्यवस्थापक (व्यावसायिक) दत्तात्रय झेंडे यांची वाघोलीचे उपमुख्य व्यवस्थापक म्हणून बदली करण्यात आली आहे. महापालिकेचे उत्पन्न बुडविणाऱ्या ठेकेदारावर कारवाई न करणाऱ्या महापालिकेतील अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी मनसेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत संभूस यांनी केली आहे. पीएमपीचे बस थांबे उभारण्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने महापालिकेची परवानगी न घेता परस्पर बस थांबे उभारल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. संभूस यांनी याबाबतचे पुरावे दिले होते. त्यांच्या मागणीची दखल घेत पीएमपीचे व्यवस्थापकीय संचालक, अध्यक्ष पंकज देवरे यांनी संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई सुरू केली आहे. झेंडे यांची बदली वाघोली येथे करण्यात आली आहे.‘पीएमपीने तक्रारीची दखल घेऊन कारवाई केली. मात्र ज्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या कामाकडे दुर्लक्ष केले त्यांच्यावर कारवाई करावी. या ठेकेदाराकडून तीनपट दंड वसूल करावा, अन्यथा महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करण्यात येईल,’ असे संभूस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. दरम्यान, पीएमपीएमएलने बीओटी तत्त्वावर पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत पाचशे स्टेनलेस स्टीलचे बस थांबे उभारण्याचे काम ठेकेदाराला दिले होते. या कामाच्या बदल्यात बस थांब्यांवर जाहिराती करण्याचे अधिकार कंपनीला देण्यात आले

# सरकारकडून लवकरच ‘बायो सीएनजी’ धोरण

## अत्याधुनिक पुनर्निर्मित ऊर्जा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**धान्यापासून इथेनॉल निर्मितीबरोबरच उपपदार्थांच्या साहाय्याने जैव सीएनजी हरित हायड्रोजन यांसारखी अत्याधुनिक पुनर्निर्मित ऊर्जा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी राज्य सरकारकडून लवकरच ‘बायो सीएनजी’ धोरण जाहीर करण्यात येणार आहे, अशी घोषणा सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी गुरुवारी केली.**



‘वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन’ (विस्मा) तर्फे ‘भारतीय साखर उद्योगातील परिवर्तन आणि भविष्याचा मार्ग’, ‘साखर आणि संबंधित उत्पादनांच्या निर्मिती आणि प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर’, ‘हरित हायड्रोजन उत्पादन साखर उद्योगासाठी समृद्धी क्षितिज’ या विषयांवर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाटील बोलत होते. विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, महासचिव डॉ. पांडुरंग राऊत, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष शहाजीराव भड, साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ, ‘यशदा’चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे, कृषिशास्त्रज्ञ डॉ. बाळकृष्ण जमदग्नी, जैवऊर्जा तज्ज्ञ डॉ. संजय पाटील यावेळी उपस्थित होते.पाटील म्हणाले, ‘उसाच्या भुशापासून वीजनिर्मिती, मळीपासून इथेनॉल निर्मिती, इथेनॉलपासून विमानाचे इंधन, कारखान्यातील सांडपाण्यापासून आणि घाणचिखलापासून बायोगॅस आणि त्यापासून बायो सीएनजी आणि ग्रीन हायड्रोजन असे टाकाऊतून टिकाऊ निर्मिती केली जात आहे.

### उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार

आता भविष्यातील इंधन साखर उद्योगांमधून निर्माण होणार असल्याचे जगाचे लक्ष याकडे लागले आहे. यावेळी श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना (पुणे) द्वारकाधिश साखर कारखाना (नाशिक), दालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रिज (कोल्हापूर) आणि नॅचरल शुगर अँड अलाइड इंडस्ट्रिज (धाराशिव) या कारखान्यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार देण्यात आला.

**आरोग्य सेवा** पालिकेच्या तालेरा रुग्णालयात सीएसआर निधीतून डायलिसिस

# सर्वसामान्य रुग्णांना आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा!

## सुविधेमुळे मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळेल; महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त खोराटे

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचा उद्देश सर्वसामान्य नागरिकांना आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. तालेरा रुग्णालयात सुरू झालेले हे डायलिसिस सेंटर म्हणजे त्याच दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या सुविधेमुळे मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळेल आणि त्यांना जवळच मिळणा-या या सुविधेमुळे त्यांची धावपळ कमी होण्यास मदत होईल असे प्रतिपादन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या तालेरा रुग्णालयात महापालिकेच्या वतीने नवीन डायलिसिस केंद्र उभारण्यात आलेले आहे या केंद्रासाठी फियाट इंडिया ऑटोमोबाईल्स प्रायव्हेट लिमिटेड (FIAPL) कंपनीच्या सहकार्याने सीएसआर फंडातून ८ डायलिसिस मशिन अत्याधुनिक बेडसह देण्यात आले आहेत, या डायलिसिस सेंटरचे उद्‌घाटन अतिरिक्त आयुक्त खोराटे यांच्या हस्ते संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेंद्र फिरके,डॉ.संगिता तिरूमणी,डॉ.संजय सोनेकर,डॉ.लक्ष्मीकांत अत्रे, डॉ.अलवी नासिर,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सीएसआर मुख्य सल्लागार विजय वावरे, फियाट कंपनीच्या मानव संसाधन विभागाच्या सहाय्यक उपाध्यक्ष संचिता कुमार, सीएसआर उप व्यवस्थापक शुभम बडगुजर आणि अमोल फटाळे यांच्यासह महापालिकेच्या सीएसआर सल्लागार श्रुतिका मुंगी तसेच रुग्णालयातील कर्मचारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त खोराटे म्हणाले,आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तालेरा आणि जिजामाता रुग्णालयात सुरू झालेल्या या डायलिसिस सेंटरमध्ये उच्च दर्जाची यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक डायलिसिस मशीन, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी, रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र बेडची सोय, आपत्कालीन उपचाराची तत्पर सुविधा आणि रुग्णांसाठी स्वच्छ, सुसज्ज वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. महापालिकेच्या या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, आरोग्यसेवा अधिक परिणामकारकरीत्या नागरिकांपर्यंत पोहोचेल.

फियाट कंपनीने मागील वर्षी सीएसआर फंडातून २८० दिव्यांग मुलांना कृत्रिम अवयव, व्हीलचेअर्स, श्रवणयंत्रे आदी साहित्याचे वितरण केले होते. तर यावर्षी तालेरा रुग्णालय येथे ८ खाटांचे तर जिजामाता रुग्णालय येथे ४ खाटांचे डायलिसिस मशिन,अत्याधुनिक बेडसह फियाट कंपनीच्या सीएसआर फंडातून देण्यात आले आहेत तसेच या डायलिसीस सेंटर साठी एमक्युअर कंपनीच्या सीएसआर फंडातून आर.ओ. प्लॅन्ट देखील बसविण्यात आला आहे.

### डायलिसिस सेंटरमध्ये रुग्णांसाठी सुविधा:

- अत्याधुनिक डायलिसिस मशीनची सुविधा
- प्रशिक्षित डॉक्टर व तज्ज्ञ तंत्रज्ञांची उपलब्धता
- प्रत्येक रुग्णासाठी स्वतंत्र व स्वच्छ बेडची सोय
- आपत्कालीन उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा
- निर्जंतुकीकरण आणि स्वच्छतेची काटेकोर काळजी
- रुग्णांच्या सोयीसाठी आरामदायी,हवेशीर व सुरक्षित वातावरण
- वेळोवेळी आरोग्य तपासणी व मार्गदर्शनाची सोय
- लिफ्टची सोय

“ पिंपरी चिंचवड महापालिका गेल्या काही वर्षांत आरोग्य सेवेत सातत्याने सुधारणा करत आहे. तालेरा,जिजामाता व आकुर्डी रुग्णालयात नव्या डायलिसिस युनिटची भर पडल्याने आरोग्य सेवांच्या उपलब्धतेत आणखी वाढ झाली आहे. तालेरा रुग्णालयातील हे डायलिसिस युनिट पिंपरी चिंचवडकरांसाठी दिलासा देणारे ठरणार असून महापालिकेच्या ‘सर्वांसाठी आरोग्य’ या संकल्पनेला बळकटी देणार आहे.

**–डॉ. लक्ष्मण गोफणे,**
आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# लोणावळा नगरपरिषदेसाठी नव्याने तेरा प्रभागांची निश्चिती

## प्रारूप प्रभाग रचना जाहीर; 27 सदस्यांची निवड होणार; बारा प्रभागांमध्ये प्रत्येकी दोन सदस्य

।लोणावळा।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंलोणावळा नगर परिषदेसाठी प्रारूप प्रभाग रचना नुकतीचजाहीर करण्यात आली. यानुसार, नव्याने १३ प्रभाग निश्चित करण्यात आले असून, एकूण २७ नगरसेवक निवड होणार आहेत. प्रभागांमध्ये प्रत्येक दोन सदस्य असणारे बारा प्रभाग आणि एक प्रभाग तीन सदस्यांचा आहे.**





या प्रभागरचनेला हरकत अर्जासाठी आणि सूचना नोंदविण्यासाठी ७ सप्टेंबरपर्यंत वेळ देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिक, इच्छुक व राजकीय पक्षांनी हरकत अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

प्रारूप प्रभाग रचना नगर परिषद व निवडणूक विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून, कार्यालयातही त्याचे प्रदर्शन ठेवण्यात आले आहे.

लोणावळा नगरपरिषदेच्या नव्या प्रभाग रचनेनुसार १३ प्रभाग निश्चित झाले आहेत. यामध्ये बारा प्रभागांमध्ये प्रत्येकी दोन सदस्य, तर एक प्रभाग तीन सदस्य, निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आला आहे. १७५ सदस्यसंख्या प्राप्त झालेल्या हद्दवाढी नंतर प्रशासन व सरकार ने सहा महिन्यांपूर्वी नवीन प्रभाग रचना निश्चित करण्यासाठी प्रभाग समिती गठीत केली होती.या समितीने लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, समाजघटकांचे प्रमाण व तत्सम निकष लक्षात घेऊन प्रारूप प्रभाग रचना निश्चित केली आहे.२०२१ च्या जनगणनेचे आकडे उपलब्ध नसल्याने २०११ च्या जनगणनेचा आधार घेऊन प्रारूप प्रभाग रचना निश्चित करण्यात आली आहे. प्रशासक डॉ. राहुल गुप्ता व मुख्याधिकारी निखिल माळी यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रारूप प्रभाग रचना निश्चित करण्यात आली आहे. या प्रारूप प्रभाग रचनेवर ७ सप्टेंबरपर्यंत नागरिकांनी आपली मते, हरकती व सूचना लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### जेथे भगवंताचें नामस्मरण। तेथे सर्व संतांचें ठाण॥

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास॥ परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ॥ जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ॥ विषयी एकजीव झालो जाण। सुटता न सुटे आपण जाण ॥

मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ॥ अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण ॥ सुख-दु:ख, विपत्ति-आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती ॥ आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण॥

आता करी शूर मन । मायेसी हटवावे आपण ॥ जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें ॥ एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान॥ ज्याच्यांत मानावें मी सुख । त्याच्यातच उद्भवतें दु:ख ॥ नराचा होय नारायण । जर न चुकला मार्ग जाण ॥

जेथे ठेवावी आस । त्याचे बनावें लागतें दास ॥ देह तो पंचभूतांचा । त्याचा भरवसा न मानावा फारसा॥ मी तुम्हांस सांगतों हित । दृश्यांत न ठेवावें चित्त ॥ दृश्य वस्तु नाशिवंत असते । भगवत्कृपेने समाधान येतें॥

परिस्थिति नसे बंधनास कारण । असे आपलेच मनाची ठेवण ॥ देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण ॥ विषयाचा नाही झाला जोंवर त्याग । तोंवर रामसेवा नाही घडत सांग ॥ आपलें आत्यंतिक हित । हेंच खरा स्वार्थ जाण ॥

चित्तीं जे विषयापासून सुटले । ते आनंदासी आले ॥ रामनाम प्रेमयुक्त चाले धणी । त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ॥ द्रव्यदारावर्जित जाण । ही खरी संताची खूण॥ सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी । त्याला नाही दुसरी सरी ॥

आल्यागेल्यास द्यावे अन्नदान । मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति । यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ॥ न धरावी जगाची आस । तोच होऊ पाहे रामदास ॥

**बोधवचन:- देहासकट माझा प्रपंच। रामा केला तुला अर्पण॥ ऐसें वाटत जावें चित्तीं। कृपा करील रघुपति॥**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**नवी मुंबईतील राजकीय व प्रशासनिक हालचालींमध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेली भेट निश्चितच महत्त्वाची ठरली आहे. ही भेट राजकीय रंगसंगतीपेक्षा जास्त शहर विकास, वाहनतळ, आणि पार्किंग व्यवस्थापन यांसारख्या मूळ प्रश्नांवर केंद्रित होती, हे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. या संवादातून उलगडलेली वास्तवस्थिती आणि राज ठाकरे यांचे विचार हे केवळ एक पक्षीय भूमिका नसून, शहरांच्या वाढत्या समस्या सोडवण्यासाठी सखोल चिंतन करायला भाग पाडतात.**

# शहर विकासाची आव्हाने! देवेंद्र- राज भेटीचा अर्थ काय?



### केवळ रस्ते आणि वाहने नव्हे, तर नियोजनाचा अभाव

महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे यांसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये लोकसंख्येचा विस्फोट झाला आहे. परप्रांतीय लोकांचा येणारा लोंढा या शहरांना वेगाने विस्तारण्यास भाग पाडतोय, पण त्याचा पुरेसा परिणामकारक नियोजन न झाल्यामुळे समस्यांचे बळ वाढले आहे. रस्ते छोटे, वाहतुकीसाठी असलेल्या जागा अपुरी, आणि पार्किंगची तुटवडा यामुळे ट्रॅफिक कोंडी आणि अपघातांची शक्यता वाढली आहे. राज ठाकरे यांनी पार्किंगचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "सर्वच गोष्टी फुकट मिळत नाहीत." शहरात पार्किंगची जागा, वाहनतळ व्यवस्थापन यासाठी थोडा खर्च करावा लागेल, हे स्विकारले पाहिजे. मुंबईसारख्या घनदाट शहरात गाडीची सुरक्षितता आणि ती रस्त्यावर व्यवस्थित पार्क होणे यासाठी महिन्याला काही हजार रुपये फी लावणं, म्हणजे फक्त ट्रॅफिक समस्येवर नियंत्रण मिळवण्याचा एक पर्याय आहे. जर आपण या बाबतीत दबाव टाकला नाही, तर शहरांतील ट्रॅफिकचा कोंडीत वाढ होईल आणि सामान्य नागरिकांची दैनंदिन जीवनं अधिक कष्टदायी होतील. याशिवाय, थोडक्यात जागा जास्त लोकसंख्येसाठी पुरेशी नाही यावर लक्ष देणं फार गरजेचं आहे. शहराची वाढ एकवटलेली आणि नियोजित हवी; केवळ जमीन विक्री करुन किंवा इमारती उंचावून समस्या सुटणार नाहीत.

### फक्त जागेचा प्रश्न नाही, तर धोरणाचा मुद्दा

राज ठाकरेंच्या म्हणण्यानुसार, मुंबईत सी-लिंक परिसरात पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झाला, पण काही धनदांडग्यांनी दबाव टाकून ती जागा काढून टाकायला भाग पाडले. हे दाखवते की शहर विकासात व्यावसायिक दबावांमुळे सार्वजनिक हिताची दखल न घेतली जाते. शहरात पार्किंगची जागा ही फक्त कारचे थांबण्याचे ठिकाण नाही, तर रस्त्यांवरील ट्रॅफिक व्यवस्थापनाचा महत्वाचा भाग आहे. पार्किंगचा प्रश्न जर व्यवस्थित हाताळला नाही, तर रस्त्यावर वाहने अडथळा निर्माण करतील, ज्यामुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होतो. त्यामुळे पार्किंगसाठी जागा राखणे आणि त्यासाठी ठोस धोरण आखणे गरजेचे आहे.

### अर्बन नक्षलवादाऐवजी शहरांमध्ये शिस्तीची गरज

राज ठाकरेंनी अर्बन नक्षलवादाबाबत म्हणणं केवळ विडंबनच नाही, तर एक गंभीर इशारा आहे की, शहरांच्या विकासासाठी आणि प्रशासनासाठी योग्य शिस्तीची गरज आहे. अर्बन नक्षलवादाच्या धुमाकूळात हरवलेला समाज आणि प्रशासन खरा प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत आहे, आणि त्यामुळे ज्या मूलभूत समस्यांचा सामना करावा लागत आहे, त्या अधिकच गुंतागुंतीच्या होत आहेत. शिस्तीमुळे ट्रॅफिक नियंत्रित होतो, सार्वजनिक वाहतुकीचा दर्जा सुधारतो, आणि नागरिकांचा जीवनमान सुधारतो. पण यासाठी प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकत्र काम करून शिस्तीबाबत कडक धोरण आखणे आवश्यक आहे.

### जमीन व विकास: धोरणात्मक निर्णय

राज ठाकरेंनी त्यांच्या भाषणात अदानीसारख्या मोठ्या कॉर्पोरेट्सच्या जमिनीच्या खरेदीबाबतही गंभीर चिंता व्यक्त केली. धारावी सारख्या भागात रस्त्यांचे काय होणार, सार्वजनिक सुविधा कशा राहतील याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. नगर नियोजन (DP) आणि टाऊन प्लॅनिंग (TP) मधील विसंगती शहर विकासाच्या प्रक्रियेत अडथळा आणते. त्यामुळे प्रशासनाने या दोन्ही योजना वेळेत आखल्या पाहिजेत, ज्यामुळे अराजकता टाळता येईल आणि विकासाचा दर्जा सुधारता येईल.

### लोकसंख्या आणि शहरी व्यवस्था

प्रयागराज सारख्या शहरांमध्ये लोकसंख्या ४० लाखांपर्यंत पोहोचली आहे, आणि त्याप्रमाणे सुविधांची मागणी वाढत आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांवर परप्रांतीय लोकांचा दबाव आहे आणि त्याचा समतोल राखणं अत्यंत गरजेचं आहे. लोकसंख्येची वाढ नियंत्रणाबाहेर गेल्यास, तर सार्वजनिक सुविधा, वाहतूक, रहाण्याच्या जागा यावर गंभीर परिणाम होईल. म्हणूनच बाहेरून येणाऱ्या लोकसंख्येच्या वाढीवर नजर ठेवून आवश्यक ते नियोजन केले पाहिजे.

### शाश्वत शहर विकासासाठी जागरूकता आवश्यक

राज ठाकरेंनी मांडलेली मते केवळ मनसेची भूमिका नाही, तर आजच्या शहरी भारतातील वास्तव प्रतिबिंबित करतात. शहरांचे नियोजन, वाहतूक व पार्किंग व्यवस्थापन, शिस्त आणि प्रशासनातील स्पष्ट धोरणे यावर सर्व पक्षांनी लक्ष केंद्रीत केले पाहिजे. शहरी विकासाला धोरणात्मक रूप देणं हे केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर स्थानिक प्रशासन, नागरिक आणि व्यावसायिक यांचं सहकार्य आवश्यक आहे. फक्त मोठमोठ्या पुलांच्या किंवा मेट्रोच्या प्रकल्पांवर भर देऊन समस्या सुटणार नाहीत, तर वाहतूक नियंत्रण आणि जागेचा परिणामकारक वापर हाच खरी गरज आहे. आणि हे शक्य होईल तेव्हा जेव्हा शहरातील प्रत्येक नागरिक, पक्ष आणि प्रशासन एकत्र येऊन शिस्तीने आणि न्यायाने शहराला विकासाच्या दिशेने नेईल. यासाठी राज ठाकरे यांनी दिलेला संदेश आजच्या काळात अधिकच महत्त्वाचा वाटतो.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

भाजपवर टीका

## थोरातांच्या केसालाही धक्का लागणार नाही

# 'मूंह में राम, बगल में छुरी'!

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा इशारा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना कीर्तनकार संग्राम भंडारे यांनी आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल अशी धमकी दिल्याने काँग्रेस आक्रमक झाली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नेते बाळासाहेब थोरात हे महात्मा गांधी यांच्या तत्त्वाने चालणाऱ्या पक्षात आहेत. त्यांच्या केसाला धक्का लावण्याची धमक नथुराम गोडसेंच्या औलादीत नाही, असे म्हणत संग्राम भंडारे व भाजपवर टीका केली.**



### गोडसेसुद्धा गांधीजींच्या पाया पडला

नथुराम गोडसेंच्या औलादीत नाही, असे म्हणत संग्राम भंडारे व भाजपवर टीका केली. 'मूंह में राम, बगल में छुरी', ही भाजपची खेळी आहे. महात्मा गांधी यांचा खून करण्याआधी नथुराम गोडसेसुद्धा गांधीजींच्या पाया पडला व नंतर तीन गोळ्या झाडल्या हा इतिहास आहे. आजही त्या गोडसेचे गुणगान गाणाऱ्या औलादींना भाजप पोसत आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

'मूंह में राम, बगल में छुरी', ही भाजपची खेळी आहे. महात्मा गांधी यांचा खून करण्याआधी नथुराम गोडसेसुद्धा गांधीजींच्या पाया पडला व नंतर तीन गोळ्या झाडल्या हा इतिहास आहे. आजही त्या गोडसेचे गुणगान गाणाऱ्या औलादींना भाजप पोसत आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. धमकी देणारा म्हणतो 'आम्ही नथुराम गोडसे होऊ' ते तर नथुराम गोडसे आहेतच, पण तुमचा पक्षही नथुराम गोडसेंच्या विचाराने चालला आहे. बाळासाहेब थोरात हे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या तत्त्वाने चालणाऱ्या पक्षात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्यातील वातावरण खराब करावे म्हणून काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांविरोधात अशी वक्तव्ये करून प्रसिद्धी मिळवण्याचा काहींचा प्रयत्न आहे. भारतीय जनता पक्ष अशा लोकांना का पाळतो, याचे उत्तर त्यांना द्यावे लागेल, अशी टीका सपकाळ यांनी केली.

भाजपने असे राजकारण करू नये आणि आज भाजप विरोधकांवर ज्यांना सोडतो तेच उद्या भाजपच्या अंगावर येतील, असा इशारा देत अशा धमक्या देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच प्रोत्साहन आहे. त्यामुळे कारवाई होणारच नाही, असेही सपकाळ म्हणाले.'मूंह में राम, बगल में छुरी', ही भाजपची खेळी आहे. महात्मा गांधी यांचा खून करण्याआधी नथुराम गोडसेसुद्धा गांधीजींच्या पाया पडला व नंतर तीन गोळ्या झाडल्या हा इतिहास आहे. आजही त्या गोडसेचे गुणगान गाणाऱ्या औलादींना भाजप पोसत आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. धमकी देणारा म्हणतो 'आम्ही नथुराम गोडसे होऊ' ते तर नथुराम गोडसे आहेतच, पण तुमचा पक्षही नथुराम गोडसेंच्या विचाराने चालला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज्यातील वातावरण खराब करावे म्हणून काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांविरोधात अशी वक्तव्ये करून प्रसिद्धी मिळवण्याचा काहींचा प्रयत्न आहे. भारतीय जनता पक्ष अशा लोकांना का पाळतो, याचे उत्तर त्यांना द्यावे लागेल, अशी टीका सपकाळ यांनी केली. भाजपने असे राजकारण करू नये आणि आज भाजप विरोधकांवर ज्यांना सोडतो तेच उद्या भाजपच्या अंगावर येतील, असा इशारा देत अशा धमक्या देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच प्रोत्साहन आहे. त्यामुळे कारवाई होणारच नाही, असेही सपकाळ म्हणाले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांना कीर्तनकार संग्राम भंडारे यांनी आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल अशी धमकी दिल्याने काँग्रेस आक्रमक झाली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नेते बाळासाहेब थोरात हे महात्मा गांधी यांच्या तत्त्वाने चालणाऱ्या पक्षात आहेत.

# अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांना चाप

## दौऱ्याचा सरकारला काय उपयोग होणार तपशील द्यावा लागणार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सरकारी अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यावर सरकारने नियंत्रण आणले आहे. अधिकाऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या परदेश दौऱ्याचा सरकारला काय उपयोग होणार याचा तपशील द्यावा लागणार आहे. हा तपशील असलेला अर्ज भरून दिल्यानंतरच दौऱ्याला सरकारची परवानगी मिळणार आहे. अभ्यास दौरे तसेच प्रशिक्षणाच्या नावाने सरकारी अधिकारी अभ्यास दौरा करतात. त्यासाठी प्रस्ताव परिपूर्ण अवस्थेत सरकारला सादर केले जात नाहीत.**



### मंत्र्यांची परवानगी लागणार

विशेष म्हणजे सनदी अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवरही नियंत्रण आणण्यात आले आहे. सनदी अधिकाऱ्यांना परदेश दौऱ्यावर जावे लागणार असेल तर संबंधित दौऱ्याला खात्याच्या मंत्र्यांची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्याचप्रमाणे परदेश दौऱ्याच्या शिष्टमंडळात खासगी व्यक्तीचा समावेश असल्यास त्याची इत्थंभूत माहिती सामान्य प्रशासन विभागाला द्यावी लागणार.

त्याचप्रमाणे कागदपत्रांमध्ये त्रुटी तसेच अनेकदा विसंगती असते. बऱ्याचदा चार ते पाच अधिकारी एकत्र एकावेळी परदेश दौऱ्यावर जात असतात. यामध्ये सनदी अधिकारी, सार्वजनिक उपक्रम मंडळे, महामंडळे इत्यादी पदाधिकाऱ्यांचे पथकच परदेश दौऱ्यावर जाते. यावर आता सरकारकडून नियंत्रण आणण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात शासन निर्णयाद्वारे स्पष्ट निर्देश दिले आहेत. परदेश दौरा सरकार किंवा सरकारी अधिपत्याखालील संस्थेकडून काढण्यात आले असेल तर त्याच्या खर्चाची माहिती जर तो खासगी संस्थेकडून काढण्यात आला तर दौऱ्यामागचे नेमके कारण काय. आणि या संस्थेच्या उत्पन्नाचा नेमका स्रोत काय याचीही माहिती अर्जात नमूद करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे सदरचा दौऱ्याचे प्रयोजन व दौरा सरकारला कसा उपयुक्त ठरेल याचीही माहिती द्यावी लागणार आहे.परदेश दौऱ्याची निमंत्रणे मिळवतात. त्यामुळे दौऱ्याचे निमंत्रण कोणामार्फत आले, निमंत्रण देणाऱ्या संस्थेचा तपशीलही सामान्य प्रशासन विभागाला सादर करावा लागणार आहे.

पावसाळी अधिवेशन वारंवार येणाऱ्या व्यत्ययामुळे कामकाज तहकुबी

# अधिवेशनात 27 विधेयके मंजूर!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महिनाभर चाललेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाची गुरुवारी सांगता झाली. वारंवार व्यत्यय, तहकूब आणि सभात्यागानंतरही लोकसभेत १२ आणि राज्यसभेत १५ अशी एकूण २७ विधेयके मंजूर करण्यात आली. पावसाळी अधिवेशनाला २१ जुलैपासून सुरुवात झाली होती. या वेळी 'ऑपरेशन सिंदूर'वरील चर्चावगळता दोन्ही सभागृहांमध्ये फारसे कामकाज झाले नाही.**

## अधिवेशनाला २१ जुलैपासून सुरुवात



अधिवेशनात सुरुवातीला विरोधकांनी 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चेची मागणी केली होती. त्यानंतर बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेवर चर्चा करण्याच्या मागणीसाठी विरोधकांनी सभागृहात गोंधळ घातला. वारंवार येणाऱ्या व्यत्ययामुळे सभागृहाचे कामकाज अनेकदा तहकूब करावे लागले.पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यसभेत कोणत्याही व्यत्ययाशिवाय मंजूर झालेले 'द बिल ऑफ लेडिंग बिल २०२५' विधेयक वगळता, इतर विधेयके गदारोळात चर्चेनंतर किंवा विरोधी पक्षांनी सभात्याग केल्यानंतरच मंजूर करण्यात आली. यंदा संसदेत खूप गोंधळ झाला.

विरोधकांनी सरकारी पक्षाला सहकार्य केले नाही. विरोधकांनी अनेक महत्त्वाच्या विधेयकांवरील चर्चेत भाग घेतला नाही, असे एका सरकारी अधिकाऱ्याने सांगितले.गुरुवारी समाप्त झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात वारंवार व्यत्यय आला. परिणामी वारंवार तहकुबीमुळे लोकसभेतील ८४ तासांपेक्षा अधिक वेळ वाया गेल्याचे समोर आले. लोकसभा सचिवालयाच्या माहितीनुसार, २१ जुलैपासून सुरू झालेल्या या अधिवेशनात २१ बैठका झाल्या ज्यामध्ये ३७ तास ७ मिनिटे कामकाज झाले.गुरुवारी समाप्त झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात वारंवार व्यत्यय आला. परिणामी वारंवार तहकुबीमुळे लोकसभेतील ८४ तासांपेक्षा अधिक वेळ वाया गेल्याचे समोर आले. लोकसभा सचिवालयाच्या माहितीनुसार, २१ जुलैपासून सुरू झालेल्या या अधिवेशनात २१ बैठका झाल्या ज्यामध्ये ३७ तास ७ मिनिटे कामकाज झाले.

दरम्यान, सर्व पक्षांनी अधिवेशनाच्या सुरुवातीलाच १२० तास चर्चा होईल, असा निर्णय घेतल्याचे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितले. 'व्यवसाय सल्लागार समितीनेही यावर सहमती दर्शवली. परंतु सततच्या व्यत्ययामुळे या अधिवेशनात आम्हाला केवळ ३७ तास काम करता आले,' असे त्यांनी अधोरेखित केले.गोवा विधानसभा मतदारसंघांतील अनुसूचित जमातींच्या प्रतिनिधित्वाचे पुनर्समायोजन विधेयक, व्यापारी नौभरण विधेयक, मणिपूर वस्तू आणि सेवा कर (सुधारणा) विधेयक, मणिपूर विनियोजन (क्रमांक २) विधेयक, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक, राष्ट्रीय उत्तेजक द्रव्यविरोधी (सुधारणा) विधेयक, आयकर विधेयक, कर कायदा (सुधारणा) विधेयक, भारतीय बंदरे विधेयक, खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) सुधारणा विधेयक, भारतीय व्यवस्थापन संस्था (सुधारणा) विधेयक आणि ऑनलाइन गेमिंगचा प्रचार आणि नियमन विधेयकजहाजातील मालवाहतुकीसंदर्भातील पावती विधेयक, समुद्रमार्गे मालाची वाहतूक विधेयक, समुद्र व्यापार विधेयक, मणिपूर वस्तू आणि सेवा कर (सुधारणा)विराष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक, राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक (सुधारणा) विधेयक, आयकर विधेयक, कर कायदा विधेयक, भारतीय बंदरे विधेयक, खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) सुधारणा विधेयक, द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक, भारतीय व्यवस्थापन संस्था (सुधारणा) विधेयक, ऑनलाइन गेमिंगचा प्रचार आणि नियमन विधेयक.

## लोकसभेत मंजूर झालेली विधेयके

अधिवेशनात सुरुवातीला विरोधकांनी 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चेची मागणी केली होती. त्यानंतर बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेवर चर्चा करण्याच्या मागणीसाठी विरोधकांनी सभागृहात गोंधळ घातला. वारंवार येणाऱ्या व्यत्ययामुळे सभागृहाचे कामकाज अनेकदा तहकूब करावे लागले.

# लोकशाही नष्ट करण्याचा डाव

## काँग्रेस नेते जयराम रमेश यांचा निवडणूक आयोगावर आरोप

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'बिहारमधील मतदार याद्यांची विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहीम मतदारांची पडताळणी करण्याबद्दल कमी आणि लोकशाही नष्ट करण्याबद्दल अधिक आहे', असा आरोप काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी गुरुवारी केला. रमेश यांनी यासाठी निवडणूक आयोगाच्या २०२४ च्या बिहारमधील सर्व २४३ विधानसभा मतदारसंघांच्या सर्वेक्षणाचा दाखला दिला.**



जयराम रमेश यांनी 'एक्स'वर एक माध्यम अहवाल प्रसिद्ध केला. त्यात दावा केला आहे की, निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदारांची पडताळणी करण्यासाठी 'एसआयआर' मोहीम सुरू केली, परंतु मतदारांच्या महितीवरील त्यांच्या स्वतःच्या '२०२४ केएपी' (ज्ञान, दृष्टिकोन आणि पद्धती) सर्वेक्षणात बिहारमधील मतदार यादी जवळजवळ अचूक असल्याचे आढळून आले, जी मतदार यादी प्रणालीची मजबुती दर्शवते.अनेक नागरिकांनी मतदार ओळखपत्रामधील गुंतागुंतीबद्दल आयोगाचे लक्ष वेधले, परंतु निवडणूक आयोगाने त्याकडे दुर्लक्ष केले. जानेवारी २०२५ मध्ये बिहारमध्ये 'एसआयआर' मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे असे निवडणूक आयोगाला वाटले नाही, परंतु त्यानंतर असे काय बदलले? असा प्रश्नही रमेश यांनी केला.जयराम रमेश यांनी 'एक्स'वर एक माध्यम अहवाल प्रसिद्ध केला. त्यात दावा केला आहे की, निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदारांची पडताळणीस्वतःच्या '२०२४ केएपी' (ज्ञान, दृष्टिकोन आणि पद्धती) सर्वेक्षणात बिहारमधील मतदार यादी जवळजवळ अचूक असल्याचे आढळून आले.

## निवडणूक आयोगाने दुर्लक्ष केले

अनेक नागरिकांनी मतदार ओळखपत्रामधील गुंतागुंतीबद्दल आयोगाचे लक्ष वेधले, परंतु निवडणूक आयोगाने त्याकडे दुर्लक्ष केले. जानेवारी २०२५ मध्ये बिहारमध्ये 'एसआयआर' मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे असे निवडणूक आयोगाला वाटले नाही, परंतु त्यानंतर असे काय बदलले? असा प्रश्नही रमेश यांनी केला.

# अर्शद आणि अक्षय कुमारचा जॉली- 3 कायद्याच्या कचाट्यात

जॉली LLB 3 या चित्रपटाची घोषणा काही दिवसांपूर्वीच झाली आहे. जॉली एलएलबी आणि जॉली एलएलबी २ या दोन चित्रपटांमध्ये अनुक्रमे अर्शद वारसी आणि अक्षय कुमार यांच्या भूमिका आहेत. दरम्यान पार्ट ३ मध्ये हे दोघंही झळकणार आहेत. चित्रपटात पुन्हा कोर्ट रुम ड्रामा पाहण्यास मिळणार आहे. या चित्रपटाची उत्सुकता आहे तरीही चित्रपट वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कारण अर्शद वारसी आणि अक्षय कुमार यांना या प्रकरणी पुणे न्यायालयाने नोटीस बजावली आहे. या चित्रपटाचे आधीचे दोन भाग उत्तम होते. त्यातला वादी-प्रतिवादी वकिलांचे दावे-प्रतिदावे उत्तम प्रकारे सादर करण्यात आले होते. दोन्ही चित्रपटांमध्ये विषय आणि आशय अशा दोन्ही बाबी होत्या. त्यामुळे तिसऱ्या भागात काय असणार? ही उत्सुकता आहे. दरम्यान चित्रपट प्रदर्शित होण्याआधीच कायद्याच्या




कचाट्यात अडकला आहे.वकील वाजेद खान आणि गणेश मस्के यांनी एक याचिका दाखल केली आहे. त्यात त्यांनी हे म्हटलं आहे की या चित्रपटात वकिलांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अभिनेते अक्षय कुमार आणि अर्शद वारसी या दोघांनीही आमचा वकिली पेशा हा कसा विनोदी असतो हे रंगवण्याचा प्रयत्न केला आहे. तसंच यासाठी चित्रपटाचे निर्मातेही जबाबदार आहेत.

## ते मला हातोड्याने मारायचे

रवी किशन किरण रावच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'लापता लेडीज' या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसले. या चित्रपटाच्या निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी वडिलांबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं. रामलीलामध्ये अभिनय करण्यास सुरुवात केल्यावर वडील खूप रागावले होते. पण नंतर मात्र आपण सिनेसृष्टीत करिअर केल्यावर त्यांना माझा खूप अभिमान वाटत होता, असं रवी किशन यांनी सांगितलं. 'ब्रुट'ला दिलेल्या एका मुलाखतीत रवी किशन यांनी खुलासा केला की वडिलांच्या रागामुळे त्यांना १७ व्या वर्षी घरातून पळून जावं लागलं होतं. "माझे वडील मला खूप मारत होते, ते मला हातोड्याने मारायचे. त्यांना माझा खून करायचा होता आणि माझ्या आईला माहित होतं की बाबा मला मारू शकतात. ते माझा जीव घेण्यास मागेपुढे पाहणार नाही. त्यामुळे आई मला म्हणाली की 'पळून जा'. खिशात ५०० रुपये घेऊन मी घर सोडलं आणि मुंबईला जाणारी ट्रेन पकडली होती," असं रवी किशन म्हणाले.रवी किशन यांनी वडिलांच्या अशा वागणुकीचं समर्थनही केलं. "ते पुजारी होते आणि ब्राह्मण असल्याने मी शेती करावी किंवा पुजारी व्हावं किंवा सरकारी नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. आपल्या कुटुंबात एखादा कलाकार जन्माला येऊ शकतो,.

## माधवीने बनवला व्हिडीओ



'सुख म्हणजे नक्की काय असतं','स्वप्नांच्या पलिकडले' यांसारख्या टीव्ही मालिकांमधून अभिनेत्री माधवी निमकर घराघरात पोहोचली. या मालिकांमध्ये तिने साकारलेल्या खलनायिकेच्या भूमिका आजही चाहत्यांच्या लक्षात आहेत. माधवी निमकर आपल्या चाहत्यांच्या संपर्कात राहण्यासाठी अभिनयासह वैयक्तिक आयुष्यातील अनेक गोष्टी शेअर करत असते. आता तिने एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. माधवी निमकरच्या हटके लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. माधवी निमकरने इन्स्टाग्रामवर एक रील शेअर केला. या रीलमध्ये तिच्याबरोबर एक मुलगी देखील दिसत आहे. माधवीने ऐश्वर्या रायच्या २६ वर्षे जुना 'ताल' चित्रपटातील 'कहीं आग लगे लग जावे' या गाण्यावर रील बनवली आहे. माधवीने फ्लोरल प्रिंट गाऊन घातला आहे. तसेच तिने पांढऱ्या रंगाचे गॉगल्स देखील घातले आहेत. ती या व्हिडीओमध्ये खूपच सुंदर दिसत आहे.माधवी निमकर व्हिडीओ शेअर करत लिहिते, "माय फर्स्ट रील विथ माय डार्लिंग." नेटकऱ्यांनी माधवीचे कौतुक केले आहे. "क्युट", "किती सुंदर डान्स केला", "एकदम छान" अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी अभिनेत्रीच्या या व्हिडीओवर दिल्या आहे.माधवी निमकर 'सुख म्हणजे नक्की काय असतं' या मालिकेत खलनायिकेच्या भूमिकेतून प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसली आहे. या मालिकेत तिने साकारलेल्या शालिनीच्या भूमिकेला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळाली. अभिनेत्री माधवी निमकरने अनेक मालिका व चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. मात्र, तिने साकारलेल्या भूमिकेचे, तिच्या अभिनयाचे वेळोवेळी कौतुक होताना दिसते. सोशल मीडियावरदेखील अभिनेत्रीचा मोठा चाहतावर्ग आहे. माधवी निमकर सोशल मीडियावर तिचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते. चाहत्यांबरोबर संपर्कात राहण्यासाठी माधवी अभिनय क्षेत्रासह वैयक्तिक आयुष्यातल्या गोष्टीही शेअर करत असते. अभिनेत्रीच्या फिटनेसचं अनेकदा कौतुक केलं जातं.माधवी निमकरच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'सगळं करून भागले', 'पावनखिंड', 'शेर शिवराज' अशा चित्रपटांमध्ये माधवीने महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.

## देवाशिष माखिजा यांनी व्यक्त केली खंत

मनोज बाजपेयींच्या 'जोरम' या चित्रपटाचे दिग्दर्शक देवाशिष माखिजा यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. यामध्ये त्यांनी चित्रपट, राजकारण, कला, त्यांचा प्रवास आणि संघर्ष याविषयी सांगितले. एक चांगला चित्रपट बनवण्यासाठी किती मोठा संघर्ष करावा लागतो हे त्याने या मुलाखतीमध्ये सांगितले. 'आज्जी' आणि 'जोरम'सारखे अप्रतिम चित्रपट बनवल्यानंतरही पुढचा चित्रपट बनवणे कठीण असल्याचं त्याने स्पष्ट केलं. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जोरम'ला अप्रतिम रेटिंग मिळाले तसेच समीक्षकांनीही चित्रपटाला उचलून धरले पण त्यानंतरही देवाशिष यांचा संघर्ष सुरूच आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये देवाशिष म्हणाले, "२० वर्षे या इंडस्ट्रीमध्ये काम करूनसुद्धा माझ्या एकाही चित्रपटातून आर्थिक फायदा मला झालेला नाही. माझी चाळीशी उलटून चालली आहे अन् म्हणालेकमावले नाहीत. मला माझ्या घराचे भाडे भरणेदेखील जमत नाहीये. गेले पाच महीने मी भाडे दिलेले नाही. सध्या मी माझ्या घरमालकाकडे विनंती करतो आहे की त्याने मला घराबाहेर काढू नये. जेव्हा तुम्ही तुमच्या कलागुणांना अधिक प्राधान्य देता तेव्हा त्याची एक मोठी किंमत तुम्हाला चुकवावी लागते." हा एक संघर्ष आणि यासाठी ते तयार आहेत असंही देवाशिष या मुलाखतीदरम्यान म्हणाले.




## पुलकित आणि श्वेता यांचा संसार टिकला नाही

अभिनेत्री क्रिती खरबंदा आणि अभिनेता पुलकित सम्राटयांनी लग्नगाठ बांधली आहे. दोघांचा लग्नसोहळा धुमधडाक्यात पार पडला आहे. क्रिती आणि पुलकित या नवविवाहित जोडप्याने नुकतेच त्यांच्या लग्नसोहळ्याचे खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यांच्या या फोटोंवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.क्रिती आणि पुलकित यांनी शेअर केलेल्या लग्नसोहळ्याच्या फोटोमध्ये दोघेही खास लूकमध्ये दिसत आहेत. लग्नसोहळ्यासाठी क्रितीनं पिंक कलरचा लेहंगा आणि स्टोनची ज्वेलरी असा लूक केला होता. तर पुलकितनं लग्नसोहळ्यात सी ग्रीन कलरची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीच्या डिझाइननं अनेकांचे लक्ष वेधले होते.2014 मध्ये पुलकितनं श्वेता रोहिरासोबत लग्न केले होते. श्वेता ही सलमान खानची 'राखी सिस्टर' आहे. पण पुलकित आणि श्वेता यांचा संसार फार काळ टिकला नाही. पुलकित आणि श्वेता यांनी 2015 मध्ये घटस्फोट घेतला.वीरे की वेडिंग आणि तैश या चित्रपटांमध्ये क्रिती आणि पुलकित यांनी काम केलं आहे. पण पागलपंती या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान क्रिती आणि पुलकित हे एकमेकांच्या प्रेमात पडले. फुकरे, फुकरे रिटर्न्स, जय हो या चित्रपटात पुलकितनं काम केलं.

**आशिया चषकात** द्विदेशीय मालिकांसाठी मात्र नकार; क्रीडा मंत्रालयाकडून भूमिका स्पष्ट

# आशिया चषकात खेळण्यास परवानगी!

## भारत -पाकिस्तान एकाच गटात




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगामी आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लढतीचा मार्ग मोकळा झाला आहे. क्रीडा मंत्रालयाने आपली भूमिका स्पष्ट करताना बहुदेशीय स्पर्धेत भारतीय संघाला पाकिस्तानविरुद्ध खेळण्यापासून रोखले जाणार नाही असे म्हटले आहे. मात्र, त्याच वेळी या दोन पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांत भारत किंवा पाकिस्तानच काय, तर त्रयस्थ ठिकाणीही द्विदेशीय मालिका होणार नसल्याची भूमिका क्रीडा मंत्रायलाने घेतली आहे.**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लढतीबाबत संभ्रम निर्माण झाला होता. नुकत्याच इंग्लंडमध्ये झालेल्या माजी खेळाडूंच्या स्पर्धेत (वर्ल्ड चॅम्पियनशीप ऑफ लिजंड्स) भारताने पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार दिला होता. भारतीय खेळाडूंनी उपांत्य फेरीच्या लढतीवरही पाणी सोडले होते. पुढील महिन्यात संयुक्त अरब अमिराती येथे होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तान या संघांना एकाच गटात स्थान देण्यात आल्यानंतर त्यांच्यातील लढतीबाबत काय निर्णय घेतला जाणार, याकडे सर्वांचे लक्ष होते.पाकिस्तानविरुद्ध खेळायचे की नाही, याबाबतचा निर्णय सरकारकडून घेतला जातो. आम्ही केवळ त्यांच्या आदेशाचे पालन करतो, अशी भूमिका भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) घेतली जाते. आता क्रीडा मंत्रालयाने आशिया चषकात पाकिस्तानविरुद्ध खेळण्याची परवानगी दिल्याने उभय संघांत ठरल्याप्रमाणे १४ सप्टेंबरला साखळी लढत होण्याची शक्यता आहे. त्यानंतर बाद फेरी आणि अंतिम फेरीतही ते आमनेसामने येऊ शकतील.मंत्रालयाने पाकिस्तानवर भर देऊन भारताच्या आंतरराष्ट्रीय सहभागासंदर्भात नवे धोरण जाहीर केले. मंत्रालयातील सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, भारतीय खेळाडूंना पाकिस्तानात जाण्यास बंदी घालणारे आणि शेजारील देशाच्या खेळाडूंना द्विपक्षीय सामन्यांसाठी भारतात येण्यास मनाई करणारे हे धोरण तात्काळ लागू झाले आहे.भारतीय संघ पाकिस्तानमधील द्विदेशीय स्पर्धांमध्ये भाग घेणार नाहीत. तसेच आम्ही पाकिस्तानी संघांना द्विदेशीय स्पर्धांसाठी भारतात खेळण्याची परवानगी देणार नाही,' असे मंत्रालयाच्या नव्या धोरणात नमूद करण्यात आले आहे. "भारत आणि पाकिस्तान द्विदेशीय मालिका अमेरिकेत नियोजित असली तरी त्यातही संघाला खेळू दिले जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत द्विदेशीय स्पर्धा होणार नाहीत," असे मंत्रालयातील सूत्राने सांगितले. असे असले तरी, बहुदेशीय स्पर्धांत या दोन देशांच्या संघांतील लढत शक्य आहे. "आशिया चषक ही बहुदेशीय स्पर्धा आहे. त्यामुळे त्यात भारतीय संघाला पाकिस्तानविरुद्ध खेळण्यापासून आम्ही रोखणार नाही. बहुदेशीय स्पर्धांबाबत आमची भूमिका स्पष्ट आहे. आम्ही कोणताही अडथळा आणणार नाही. स्पर्धा पाकिस्तानात होणार असेल, तर मात्र त्या वेळची परिस्थिती पाहून निर्णय घेतला जाईल," असे सूत्राकडून सांगण्यात आले.क्रीडा मंत्रालयाच्या नव्या धोरणामुळे आता पाकिस्तानच्या संघांना भारतात होणाऱ्या स्पर्धांमध्ये प्रवेश मिळू शकणार आहे. भारताने २०३० ची राष्ट्रकुल स्पर्धा, तर २०३६ ची ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित करण्याचे स्वप्न बाळगले आहे. या दोन्ही स्पर्धांचे यजमानपद भूषविताना ऑलिम्पिक चळवळीला साजेशी सर्वसमावेशक भूमिका घेण्यास भारत वचनबद्ध असल्याचे धोरणात नमूद करण्यात आले आहे. याच कारणास्तव, महिनाअखेरीस बिहार येथे सुरू होणाऱ्या आशिया चषक हॉकी स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या खेळाडूंना व्हिसा मंजूर करण्यात आला होता. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तानने स्पर्धेतून माघार घेतली. "भारतीय संघ आणि खेळाडू, पाकिस्तानचा सहभाग असलेल्या बहुदेशीय आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळू शकतील. त्याचप्रमाणे, पाकिस्तानी खेळाडू आणि संघ भारताने आयोजित केलेल्या बहुदेशीय स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकतील," असे धोरणात म्हटले आहे.भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) पुढील महिन्यात होणाऱ्या निवडणुका नव्या क्रीडा विधेयकानुसार झाल्या तर आवडेलच.

### काय निर्णय घेतला जाणार

मात्र, नवीन कायद्याचे नियम त्या वेळेपर्यंत अधिसूचित झाले नाहीत, तर सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या लोढा समितीच्या शिफारशींनुसार, 'बीसीसीआय'च्या निवडणुका होऊ शकतील, असे क्रीडा मंत्रालयाच्या सूत्राकडून सांगण्यात आले. लोढा समितीच्या शिफारशींनुसार, पदाधिकाऱ्याचे वय ७० वर्षांपेक्षा अधिक असू शकत नाही.

# गिलच्या कर्णधारपदाबाबत मोठी भविष्यवाणी!

## संघाला योग्य कर्णधार हवाय", ज्योतिषतज्ज्ञांनी केलं भाकित




। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्मानंतर शुबमन गिलच्या खांद्यावर भारताच्या कसोटी संघाची जबाबदारी देण्यात आली. गिलने ही जबाबदारी चांगली पार पाडत पहिलीच कसोटी मालिका बरोबरीत ठेवण्यात मोठी भूमिका बजावली. आता कसोटीनंतर टी-२० आणि वनडेमध्ये देखील भविष्यात गिल संघाचं कर्णधारपद भूषवणार असल्याचं दिसत आहे. यादरम्यान प्रसिद्ध ज्योतिषतज्ञ ग्रीनस्टोन लोबो यांनी त्याच्या कर्णधारपदाबाबत मोठं भाकित केलं आहे.**

प्रसिद्ध ज्योतिषी ग्रीनस्टोन लोबो यांनी शुबमन गिलच्या खेळाडू आणि कर्णधार म्हणून भवितव्याबाबत धाडसी भाकीत केलं आहे. त्यांच्या मते, गिलचा "अत्यंत प्रभावी कुंडली योग" असल्यामुळे तो भारतासाठी धावांचा पाऊस पाडणारा फलंदाज ठरेल. मात्र, कर्णधार म्हणून त्याच्या कामगिरीबाबत पाहा नेमकं काय म्हणाले.टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत लोबो म्हणाले, "शुबमन गिल हा सध्या भारतीय क्रिकेटमधला उदयोन्मुख स्टार खेळाडू आहे.

त्याचा जन्म १९९७ किंवा १९९९ मधील असावा, नेमकी तारीख निश्चित नाही. त्यामुळे इंटरनेटवर जे काही लिहिलं आहे ते पूर्ण खरं असेलच असं नाही. पण तो कोणत्याही वर्षी जन्मला असला तरी त्याची कुंडली अतिशय विलक्षण आहे. त्याचे सर्व ग्रह-लघुग्रह (ASTEROIDS) प्रचंड ताकदीचे आहेत. विशेष म्हणजे त्याच्या कुंडलीत प्लूटो 'ग्रे लिझर्ड' आहे.

या अवस्थेतील प्लूटो म्हणजे असा व्यक्ती, जो कितीही मोठ्या अडचणी आणि संकटांना सामोरं गेला तरी त्यावर मात करून विजयी होतो," असं लोबो पुढे म्हणाले."याचा प्रत्यय आपण इंग्लंडविरुद्ध मालिकेत आधीच घेतला आहे. मालिकेत २-१ अशी आघाडी होती,

### शुबमनच्या नेतृत्वाची भूमिका ठळक

कसोटी मालिकेचं भवितव्य पणाला लागलं होतं आणि शुबमन गिलच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे संघाने गती पकडली. नक्कीच इतर अनेक घटक महत्त्वाचे होते, पण शुबमनच्या नेतृत्वाची भूमिका ठळक होती. ही गोष्ट खूप कमालीची होती. आता प्रश्न असा येतो की, त्याला कर्णधार करण्याचा निवड समितीचा निर्णय योग्य होता का? याचं उत्तर स्पष्ट आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। शुक्रवार ।
। दि. 22 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण विश्व: पोलिस कर्मचाऱ्यांसह नागरिकांमध्ये जनजागृती

# सायबर गुन्हेगारीविरोधात जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांचे पुढाकार!

### प्रतिभा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून सायबर सुरक्षेचे महत्व अधोरेखित

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सायबर गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असताना, नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरुकता निर्माण करणे ही काळाची गरज ठरली आहे.**



याच पार्श्वभूमीवर कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज, चिंचवड यांच्यातर्फे “सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा” या उपक्रमांतर्गत एक विशेष जनजागृती मोहिम आयोजित करण्यात आली. क्विक हील फाउंडेशन आणि सायबर जनजागृती अभियान संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांच्या पुढाकाराने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत प्रतिभा महाविद्यालयाचे विद्यार्थी निगडी परिसरात गेले व त्यांनी सामान्य नागरिकांसोबतच स्थानिक पोलिस कर्मचाऱ्यांनाही सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देऊन त्यांच्यात जनजागृती केली. सायबर गुन्हे विभागातील अधिकाऱ्यांकडूनही यावेळी विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन मिळाले. ही माहिती नागरिकांना सुलभ भाषेत देण्यात आली, जेणेकरून ते सहजपणे याचे पालन करू शकतील. मानसी वाडेकर व श्रावणी सावंत या विद्यार्थिनींनी प्रभावीपणे माहिती सादर केली. या उपक्रमात प्रकल्प समन्वयक डॉ. हर्षिता वाच्छानी, क्विक हील फाउंडेशनचे सीएसआर एक्झिक्युटिव्ह अजय शिर्के, गायत्री केसकर व दिपू सिंह यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचा व इतरांचा बचाव करण्यासाठी अशी जनजागृती मोहीम अत्यंत उपयुक्त ठरत असून, पुढील काळातही अशाच प्रकारचे उपक्रम राबवले जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

#### सायबर सुरक्षेसंदर्भात विशेष भर

1. बनावट कॉल्स आणि ईमेलद्वारे होणारी फसवणूक
2. अज्ञात लिंकवर क्लिक केल्यामुळे होणारे संभाव्य धोके
3. ओटीपी आणि पासवर्ड शेअर करताना घ्यायची काळजी
4. सोशल मीडिया वापरातील सुरक्षितता

## कृष्णानगर : शरदनगर भुयारी मार्गावर चारचाकी वाहन बंदीची मागणी

### सामाजिक कार्यकर्त्या कीर्ती मारुती जाधव यांची आग्रही विनंती

। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कृष्णा नगर प्रभागातील शरदनगर स्पाईन रोड परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दीर्घकाळ थांबलेला नाही. या समस्येच्या निराकरणासाठी स्थापत्य विभागाने कोट्यावधी रुपये खर्चून स्वामी विवेकानंद भुयारी मार्गाचा ग्रेड सेपरेटर बांधला. मात्र, पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच या भुयारी मार्गावर वाहतुकीस गंभीर अडथळा निर्माण होत असल्याने नागरिक व प्रशासनाची चिंता वाढली आहे..**



भुयारी मार्गाच्या बांधकामात तांत्रिक त्रुटी असल्याच्या चर्चाही शहरात जोरदार सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या सौ. कीर्ती मारुती जाधव यांनी शरदनगर, घरकुल, कोयनानगर, महात्मा फुले नगर, शिवाजी पार्क अशा परिसरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि वाढत्या अपघातांचा विचार करता, स्वामी विवेकानंद भुयारी मार्गावर चारचाकी वाहनांना प्रवेश बंद करावा अशी आग्रही मागणी केली आहे. त्याचबरोबर, दुचाकी वाहनांसाठी वेगळ्या मार्गावर वॉर्डन ठेवून सुकर उपाययोजना करण्यासाठीही आग्रह करण्यात आला आहे. ही मागणी लोकशाहीर जगविख्यात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली. यावेळी अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मारुती जाधव, दत्तात्रय धरमे, अभी जाधव, विशाल गरड, रोहित गरड, कुणाल पळसकर, सेफ खान, अक्षय ओहोळ, तेजस कडलक आणि घरकुल-शरदनगर परिसरातील नागरिक उपस्थित होते. पोलीस आणि पालिका प्रशासनाकडून त्वरित उपाययोजना करून शरदनगर परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्याचा नागरिकांचा आग्रह आहे.

> “शहरातील वाढती वाहतूक आणि अपघातांचा वेध घेत, आम्ही शरदनगर भुयारी मार्गावर चारचाकी वाहनांना प्रवेश बंद करण्याची विनंती केली आहे. ज्यामुळे सुरक्षित आणि सुगम प्रवासासाठी नागरिकांना मदत होईल. बदलासाठी आवाज उठवणं हाच खरा सामाजिक कर्तव्य आहे.”
> **-कीर्ती मारुती जाधव,** सामाजिक कार्यकर्त्या


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेल्या शिक्षकांना दिल्या.

> “ विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.




Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org